# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शेती व शैक्षणिक विषयक विचार

**प्रा.एम एम सूर्यवंशी**, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कॉलेज, चिखली ता. शिराळा
जि. सांगली मो.न. ९९७०७००४८० इमेल-mmsuryawanshi09@gmail.com

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. महाराजांना सन १८८५ साली राजकोट येथे राजकुमार कॉलेजमध्ये घालण्यात आले. कुस्ती, शिकार, घोडेस्वारी हा महाराजांचा छंद होता. स्वभाव मनमिळावू होता.

१८९४ पर्यंत त्यांचे शिक्षण सर एस. एम. फ्रेजर या गार्डियन यांच्या देखरेखेखाली झाले. इंगर्जी भाषा, राज्यकारभार, जगाचा इतिहास याचे सखोल अध्ययन केले. धारवाड येथे चिकाटी अभ्यास पूर्ण केला

**छ. शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार**

इंग्रजांच्या राजवटीत इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य दिले जात होते. तर भारतात अंधश्रद्धेमुळे आपण अधिक आगतिक होत गेलो होतो आपण भरडले जात होतो याच काळात राजाराम मोहन राय यांनी सत्तेच्या चालीविरुद्ध दंड थोपटले होते स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या माध्यमातून प्रबोधन सुरू ठेवले होते तर इथल्या धर्मपंडितांनी लोकांवरील पकड घट्ट करीत जात होते धर्ममार्तंडांनी शूद्रांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते "शिक्षणाच्या किल्ल्या आमच्या कमरेला आहेत". या विचाराने ते ग्रासले होते लोक दरिद्री दिशाहीन बनले होते.

शाहू पूर्वकाळातील कोल्हापूर संस्थांची स्थिती-

छत्रपती शाहू १८८४ ला गादिवर बसले आणि चित्र पालटू लागले. त्यांनी राजकीय सामाजिक शैक्षणिक शेतीविषयक आणि शैक्षणिक विषयक सुधारणा घडवून आणल्या व त्यांना महत्त्व दिले. १८८४ पूर्वी खाजगी शाळा होत्या. तेथे श्रीमंत वर्गातील मुले शिकत होती. १८४८ इंग्लिश शिक्षणाचा गंध नव्हता. त्यावेळेस मोडी भाषा लिहिणे व हिशोब ठेवणे म्हणजेच शिक्षण होय असे म्हटले जात होते. छत्रपती शाहूंच्या काळात कोल्हापूर येथे इंग्रजी शाळा सुरू झाल्या. पन्हाळा, कागल, बावडा, शिरोळ, गडिंग्लज, आळते, मलकापूर अशा ठिकाणी मराठी शाळा सुरु झाल्या. १८५३ ला मुलींची पहिली शाळा कोल्हापूर येथे स्थापन झाली १८५४ ते ५५ पर्यंत २४ शाळाची सुरुवात झाली. ३९९ विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले तर १८५९ पर्यंत १२०० विद्यार्थी इतकी संख्या वाढली. छत्रपती शाहूंनी खेड्यातील लोकांच्या मागणीनुसार खेड्यात शाळा सुरुवात केली. गरजू व हुशार मुलांना शिष्यवृत्ती देणे याकडे महाराजांनी लक्ष दिले.

महाराष्ट्रात महात्मा फुले यांचा शिक्षण क्षेत्रात जडणघडणीत मोठा वाटा असला तरी त्यांच्या मृत्यूनंतर शिक्षणाचे कार्य थांबत चालले होते ते अपूर्ण राहिलेलं काम छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी पूर्ण केले. समाजातील खालच्या स्तरातील शेतकरी कष्टकरी कामगारयांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी अज्ञान गरीब अंधश्रद्ध या गोष्टींच्यापासून मुक्तता मिळवण्यासाठी शिक्षण हेच साधन त्यांनी हाती घेतले.

**समाज शिक्षणातून समाज परिवर्तन**

छत्रपती शाहू यांच्यावर आर्य समाजाचा प्रभाव होता धर्म, शिक्षण, संस्कृती या विषयाकडे त्यांचे आकर्षण वाढले होते. श्री अण्णासाहेब लठे म्हणतात "छत्रपती शाहू महाराज बुद्धीप्रामाण्यवादी होते तरी देखील ते कर्मकांड करू इच्छित नव्हते. समाज सुधारणा शिक्षणप्रसार, समाजजागृती हे त्यांचे ध्येय होते. शाहूंना सर्व समाज साक्षर करायचा होता. त्यांना या बाबत महात्मा फुले यांच्याकडून त्यांना प्रेरणा मिळाली.

**विद्येचे अधिकार सर्वांनाचआहे**

प्रस्थापितांच्या दगडी पावलाखाली चिरडला जाणाऱ्या लाखो लोकांच्या जीवनात आशा आकांक्षांचे विचार त्यांनी निर्माण केले. करवीर संस्थानातील शिक्षणाची दयनीय अवस्था बघून शाहू महाराज म्हणतात. शिक्षणाच्या संदर्भात आमचा गतकाल म्हणजे इतिहासातील एक अखंड अंधारी रात्र. केवळ एकच जात विद्येचा उपयोग घेत होती. निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास असे निर्बंध आमच्या जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आली. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेध वाचायची बंदी होती खुद्द सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांना सुद्धा मध्यरात्री शिक्षण घ्यावं लागलं. मग इतरांची काय अवस्था थोडक्यात इतर लोकांना शिक्षणाचा अधिकारच नव्हता.

**सर्वांच्या विकासासाठी शिक्षण**

जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वातंत्र्य, समृद्ध, एकजीव, बलवान होऊ शकत नाही. याबद्दल छत्रपतींना पूर्ण विश्वास होता त्यासाठी सर्व समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून त्यांनी खामगाव येथे असे विचार मांडले की, 'शिक्षणशिवाय आमचा तरुणोपाय नाही. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची प्रगती झाली नाही इतके शिक्षणाचे महत्त्व छत्रपतींना पटले होते.

**समाज उन्नतीचेप्रभावीसाधन**

शिक्षण म्हणजे अक्रोडाचे झाड असते पुढील पिढ्यांसाठी ते बहरून येते, ते मागील पिढीने लावायची असते, ते म्हणतात आपणास एका वर्षाची तयारी करायची असेल तर धान्य पेरावे, पन्नास वर्षाची तयारी करायची असेल तर झाडे लावावीत आणि शेकडो वर्षाची तयारी करायची असेल तर माणसं पेरावीत. "ज्योतिरावांनी रचला पाया शाहू झालासे कळस "कारण पुढे या कळसावर शाहूंच्या तालमीतल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेडोपाडी शिक्षणगंगा वाहत्या केल्या. शाहूंच्या भाषेत शिक्षणाची अवहेलना होता यातून बाहेर पडणारा विद्यार्थी क्रांतीच्या प्रवासात सहभागी झाला पाहिजे. असं त्यांचं मत होतं छत्रपती शाहूंना ज्ञानाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवायचे होते. प्रत्येकाच्या मनात ज्ञानाचा प्रकाश पडावा कर्तबगार पिढी निर्माण व्हावी. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लोकांच्या मनात ऊर्मी ऊर्जा निर्माण झाली पाहिजे. शिक्षण हे संस्कारक्षम आणि नवनिर्मिती करणारे शास्त्र आहे हे त्यांनी जाणलं होतं.

**माणसं बदलण्याचं साधन म्हणजे शिक्षण**

१८८४ ला एकूण १०८८४ इतकी विद्यार्थी संख्या होती १९२१-२२ ला २७८३० इतकी झाली. याचा खर्च ७० हजार इतका होता. तर १९२१-२२ ला तीन लक्ष १५८३ रुपयांवर खर्च केला. यावरून शाहू महाराजांचे शिक्षनावर पैसे खर्च करत होते. या जनतेला कोणी वाली नाही पुढारी नाही ही उणीव भरून काढली. दीन दुबळ्या दीन-दलित दुर्लक्षित समाजाला शिक्षणातून सबल, समर्थ, सिद्ध, समृद्ध करायचं होतं. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर येथे मराठा, जैन, हरिजन, मुस्लिम, लिंगायत विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांची त्यांनी स्थापना केली. सर्व जातीची मुले एकत्र राहून शिक्षण घेतील व जोखडातून मुक्त होतील स्वतःच्या पायावर उभे राहतील असा त्यांचा विचार होता.

**अस्पृश्य विद्यार्थी वस्तीगृह निर्मिती**

शाहू महाराजांनी सन १९६० साली अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. त्यावेळी कोल्हापुरात मिस क्लार्क नावाचे एक युरोपियन अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत होती तिचे नाव जनतेसमोर रहावे. म्हणून शाहू महाराजांना वस्तीग्रह मिस क्लार्क वसतिगृह हे नाव दिलं. यापूर्वी महाराजांनी मराठा विद्यार्थ्यांच्या साठी व्हीक्टोरिया वसतीगृह सुरू केलं होतं. त्यातही अस्पृश्य व मुसलमान विद्यार्थ्यांची सोय केली होती. पण एवढ्याने अस्पृश्यांना प्रश्न सुटणार नव्हता. अस्पृश्य समाजाची शैक्षणिक आणि आर्थिक उन्नती झाली पाहिजे. ही जाणीव महाराजांना झाली त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी काही उपाययोजना केल्या होत्या.

**बहुजन समाज व राजकीय हक्क**

बहुजन समाजात शिक्षण प्रसार करणे व सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून बहुजन समाजाची मुक्तता करणे. तसेच सरकारच्या राज्यकारभारात बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे. या गोष्टींची आवश्यकता बहुजन समाज सुधारण्याच्या दृष्टीने जास्त भासू लागली होती. म्हणून शाहू महाराजांनी सन १९१६ साली निपाणी येथे डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली. पुढारलेल्या वर्गाविरुद्ध मागासलेल्या दलित जनतेची ही चळवळ होती.

**सक्तीच्या सार्वजनिक शिक्षणाची योजना**

नाशिक मधील १९२० च्या सभेतील भाषणात महाराज म्हणतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या अगोदर सध्या उपयोगात असलेली शाळा ग्रहे विस्तृत व हवेशीर असली पाहिजेत तिकडे खर्च करण्याची जरुरी आहे. आणि इथं ९० टक्के लोक उपाशी आहेत आणि दहा टक्के लोक गोळी खातात. कोंड्याची भाकरी खातात अशीचीड उत्पन्न करणारे विचार पुण्यात महाराजांच्या बद्दल मांडले जात होते.कोल्हापूरमध्ये १९१२ ला प्रत्येक खेड्यात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमण्याची प्रथा आणली. १९१४ ला त्यांनी पगारी शिक्षक नेमले. १९१७ ला वतनदार शिक्षक पद्धत बंद

केली. पुन्हा पगारी शिक्षक मिळाले. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत करण्यासाठी कमिटी सुद्धा स्थापन केली होती. गावोगावी तिचा अंमल १९१६ पासून सुरू झाला.

**व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग**

मराठा विद्यार्थ्यांचे वस्तीग्रह काढण्यासाठी महाराजांनी काही मुले वाड्यात जमवली वस्तीग्रह सुरू केले. आणि व्हीक्टरिया मराठा बोर्डींग असे भारताच्या सम्राज्ञीचे नाव दिले.

**जैन वस्तीग्रह**

१९०१ ला जैन वसतिगृह स्थापन केले. मुंबईमधून या वस्तीगृहाला मोठी देणगी मिळाली. १०० विद्यार्थ्यांची सोय झाली.

**मराठा स्टुडन्ट इन्स्टिट्यूशन**

वस्तीगृह निघाले मोठी इमारत कायमची देणगी आणि म्हैसाळकर यांचे मार्गदर्शन या सर्वांमुळे या वस्तीगृहाची वाढ झाली. १०० ते १२५ विद्यार्थी राहू लागले याच वस्तीगृहाला शाहू वस्तीगृह हे नाव दिले.

**लिंगायत वस्तीगृह**

रंकाळ्यात तलावाजवळ हे वस्तीग्रह उघडले. पन्नास विद्यार्थ्यांची सोय झाली वार्षिक देणगी कायम निधी इमारत याचा लाभ महाराजांनी दिला.

**मुस्लिम वस्तीग्रह**

मुस्लिम समाजातील आठ-दहा विद्यार्थ्यांना एकत्र जमून हे वसतिगृह स्थापन केले. पुढे हेच विद्यार्थी मराठा वस्तीगृह राहू लागले. १९०७ ला मुस्लिम वस्तीगृह सुरू केले. इथे १०० विद्यार्थ्यांची सोय केली.

**गावकामगार पाटील स्कूल**

१९११ ला हे स्कुल स्थापन केले. पाटलांना सरकारी कामात हुशार करायचे होते. त्यांना राज्यकारभाराचे शिक्षण देण्याचे काम या स्कूलने केले. लोकशाही पद्धतीने राज्यकारभार करण्याचे शिक्षण दिले गेले. इंदुमती वस्तीगृह शिवाजी मराठा हायस्कूल, श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर, याची उभारणी केली आर्थिक दृष्ट्या उत्तेजन दिले. विद्यार्थ्यांना मोफत जागा दिली. आर्थिक मदत केली गोसावी, कंजारभाट वगैरे जातींना शैक्षणिक सवलती दिल्या व पददलित त्यांची उन्नती केली.

छत्रपती शाहूंनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल तर केलेच शिवाय लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. आज खेड्यापाड्यातील शिक्षणाची गंगा ओसंडून वाहत आहे. त्यांच्यात एकोपा जोपासण्यासाठी अशा वस्तीग्रहांची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील काही भागांमध्ये अजून शिक्षणाची गंगा पोहोचलेली नाही. तिथे सुद्धा प्रयत्न करावे लागेल म्हणून या जाणत्या राजासारखी राज्यकर्त्यांची आवश्यकता ही कायमपणे भासत राहणार.

**छ.शाहूमहाराजांचेशेतीविषयकविचार**

१९७१च्या सेंट्रल ऑर्गनायझेशनच्या आकडेवारीनुसार ७०%' लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. शेतीच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ४४ टक्के इतका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती हाच आहे. शेती सुधारल्याशिवाय तरनोपाय नाही. ब्रिटिशांनी या शेतीकडे दुर्लक्ष केलं होतं अशावेळी संस्थानिक म्हणून छत्रपती शाहूंनी शेतीकडे डोळेझाक केली नाही. शेतीचा विकास व्हावा , म्हणून अनेक उपाययोजना केल्या. शेतकऱ्यांना बियाणे, खते, पैशाच्या स्वरूपात मदत केली. संशोधनाला चालना दिली. शेतीविषयक प्रदर्शने भरवली. आणि हरितक्रांतीसाठी पाटबंधारे सारख्या योजना आखल्या व त्या अमलात आणल्या शाहूंच्या मते भारतीय शेतकऱ्याला चांगली शेती करता आली पाहिजे. पण त्यात अनेक अडथळे येत (१) शेतीविषयक अज्ञान अशिक्षितपणा (२) भांडवलाचा तुटवडा (३) शेतीच्या आकारमान लहान (४) शेतीमाल विकण्याचे संघटन नाही. हे अज्ञान दूर होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार झालाच पाहिजे. त्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. खेड्यात शेतीविषयक शिक्षणाची सोय केली. संस्थानं मार्फत भांडवल पुरवठा केले. शेतीमाल विक्री करण्यासाठी ब्रिटीशांच्या प्रमाणेच सहकारी पतपेढ्या स्थापन केल्या. वारसा हक्कमुळे शेतीचे तुकडे पडतात ग्रामीण भागात फिरत असताना त्यांनी जवळून पाहिलं होतं पाण्या अभावी शेतीची हेळसांड होते काही भाग डोंगराळ आहे. उत्पन्न कमी मिळतं आणि लोक सुद्धा अतिक्रमण करून झाड तोडतात शेतीमध्ये लागवडीचे नवनवीन प्रयोग केले दक्षिण हिंदुस्थानात चहाची लागवड मोठ्याप्रमाणात केली जाते.

मोठ्या प्रमाणात होते तेथे त्यांना फायदा होतो. तिथे कॉफीची लागवड केली जाते तिथ लेह वामान भौगोलिक परिस्थितीमुळे कॉफीचे पीक मोठ्या प्रमाणामध्ये पिकवले जाते. तसे हवामान आपल्याकडे नाही तरीसुद्धा छत्रपती शाहूमहाराजांनी पन्हाळा येथे कॉफीची लागवड केली लोकांना जेणेकरून रोजगार मिळेल. पेडखले गावात (पन्हाळा ) भागात २००० रोपे लावली असे नवनवीन प्रयोग त्यांनी केले.

कोरफडीची लागवड केली जेणेकरून लोकांना रोजगार मिळेल हा हेतू होता. राळ तयार करण्यासाठी गंजन नावाचे गवत लावलं, पन्हाळा भुदरगड येथे वेलदोडा, कोको, रबर, कापूस लावला हिरडा, जांभूळ, काजू, आंबा ही रोपे लावली कांग्रा व्हॅलीमधून चहाचे बी, निलगिरीमधून चहाचे बियाणं बोरगाव येथे बालिंगा येथे लावली. सुधारित शेतीप्रसारासाठी अवजारांसाठी एक म्युझियम उघडलं. रासायनिक खते शेतकऱ्यांना मोफत वाटली, शेतात लोखंडी नांगर कुळवयांची प्रयोग केले. काही अवजारे विकत आणली बॉम्बे एग्रीकल्चरल कडून प्रकाशित होणारे पत्रक विकत घेऊन शेतकऱ्यांना वाटले. चिंचली सारख्या ठिकाणी गुरांचे प्रदर्शन भरवलं जेणेकरून शेतकरी आपल्याकडे प्रयोग करतील. शेतीविषयक उत्पादने अवजारे स्थानिकांनी तयार करावे. याशिवाय शिवणकाम, विणकाम, भरत काम यांचे नमुने घेऊन यांचं प्रदर्शन भरवलं. शेती संशोधनाला जोड म्हणून राजाराम हायस्कूलला जोडून शेतीविभाग काढला. फळ भाज्या, पालेभाज्या त्यांच्या लागवडीचे प्रयोग केले . भात, ऊस, कापूस, गहू, कडधान्य, कोबी, बटाटे, मिरच्या, ज्वारी असे लागवडीचे प्रयोग केले. आदर्श शेतीसाठी अर्लींग्टन नांगर, हंडजोब कटर विकत घेतला. पारंपरिक शेतीपेक्षा पाश्चात्य देशातील तंत्रज्ञान शेतीकरण्यावर भर दिला. शेतीचे आधुनिकीकरण झाले पाहिजे. त्यासाठी शेतीचा आकार मोठा पाहिजे. व आपल्याकडे आपल्याकडे शेतीचे तुकडे पडलेले त्यासाठी इनामी वतने रद्द केली. त्यांच्यामते शेतीचे तुकडे तर पडतातच परंतु लोक केवळ यावरच अवलंबून राहतात. त्यांचे इतर उद्योग व्यवसायाकडे लक्ष जात नाही लोक आळशी बनतात. राजाराम इंडस्ट्रियल स्कूल उद्घाटन प्रसंगी ते म्हणतात " आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेतीपद्धती ऐवजी सुधारलेल्या शेती शास्त्राचा अवजारांचा अवलंब केला पाहिजे" सुधारलेले तंत्रविज्ञान शिकवण्याच्या दृष्टीने कारागिरांनी पुढे आले पाहिजे, यासाठी माझ्याकडून योग्य ती मदत मिळेल. शेतीला पाण्याची जोड मिळाली पाहिजे दुष्काळात छोट्या-मोठ्या तलावांची बांधणी करणे, दुरुस्ती करणे, नवीन तलाव बांधणे, कच्च्या पक्क्या विहिरी बांधणे त्यांनी राधानगरी हे धरण बांधले. शेतीला जोडधंदा म्हणून जनावरांची कोंबडी आणि बदकांची पैदास दूध जनावरांची उत्पत्ती त्याला प्रोत्साहन देणे. शेतीमाल विक्रीसाठी संघटना नव्हती ती दूर करण्यासाठी सहकारी पतपेढ्या काढल्या सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले. त्यामुळेच अर्बन को-ऑपरेटिव्ह , बलभीम को-ऑपरेटिव्ह सोसायट्या निघाल्या. वसस्थानचा कायापालट झाला. मालाची देवाण घेवाण व्हावी म्हणून रेल्वेची आवश्यकता होती संस्थांना मध्ये कोणते पीक काढावे कोणते नाही रेल्वेने माल पाठवण्यासाठी त्यांनी शाहूपुरी, जयसिंगपूर अशी शहरे निर्माण केली.

शेतीचे महत्त्व त्यांना पटले होते म्हणूनच त्यांनी आपल्या युवराजाला कृषीविद्या शिकण्यासाठी विलायतेला व अलाहाबादला पाठवले शेतीतील उत्पन्न वाढीसाठी ते खटपट करत होतो. याची आपल्याला साक्ष पटते प्रमाणापेक्षा जास्त लोक शेतीत गुंतून चालणार नाही. इतर उद्योगाकडे त्यांनी वळावं असे महाराजांचे मत होते. शेतीमध्ये आपण किती गुंतवणूक करतो. त्यापेक्षा जास्त पटीने आपला फायदा होतो हे खर आहे. शेती हा उत्पादनाचा विषय शेतीतील शेतीला हीन माणू नये. शेती शिवाय समाजाचा उत्कर्ष होणार नाही असे त्यांचे विचार होते. शेतीसाठी त्यांनी लागवडीचे अनेक प्रयोग केले संशोधन केलं स्वतः जातीने लक्ष घातलं. हवामानाचा परिणाम जाणवला पण त्यांनी हार मानली नाही. कमी प्रमाणात का होईना पिकांचे उत्पादन घेतले. घाटातील जमीन पडीक न ठेवता त्यातून काही तरी पीक घेता येईल आणि डोंगराळ भागातील लोकांना रोजगार मिळेल. लोक उपाशी पोटी मारणार नाही. झाडांची रोपे वाढवली तीन वीन ठिकाणी लावली. वेगवेगळ्या खतांचा प्रयोग केला. अशी त्यांची अशी त्यांची दूरदृष्टी होती व मानवतावादी भूमिका होती.

**सारांश**

महात्मा फुले यांच्यानंतर फुले यांचे अपूर्ण राहिलेले कार्य खऱ्या अर्थाने छत्रपती शाहू महाराज यांनी पूर्ण केलेचे दिसून येते. त्यांच्यावर ब्राह्मणद्वेष्टींनी अनेक परीने टीका टिपणी केल्याचे दिसून येते. त्यांना या बाबतीत फारच त्रास सहन करावा लागला. पण भारतातील राजे-रजवाडे संस्थानिक होऊन

गेले त्यात राजश्री शाहू महाराज यांचे कार्य महत्त्वाचे म्हणावे लागते. गोरगरिबांचे कैवारी, दलितांचे आधारस्तंभ शाहू महाराज होते. करण ब्राह्मणेतर समाजातील मुले शिकली नसती तर उपाशी मरणार होती. त्याकाळात ब्राह्मणेत्तर वर्गाना कमीत कमी प्रमाणात शेती या व्यवसायावर कसेबसे जिणे जगावे लागत होते. ब्राह्मणेतर समाजातील मुलांनी शिकावे म्हणून त्यांच्यात जिद्द आणि ईर्षा निर्माण करण्याचे कार्य छत्रपती शाहूंनी केले. ईर्षा निर्माण केले, मागे पडलेली माणसे वेगाने पुढे जावेत असे शाहूना वाटत होते.

आजही महाराष्ट्रात काही मंडळी दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबद्दल प्रश्न उभे करतात त्यांना मोफत शिक्षण कशासाठी द्यायचे सर्वांनाच शिक्षण मोफत मिळाले पाहिजे गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती कशासाठी अशा शंकाकुशंका घेतात या सर्वांच्या मागे छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणा होती हे मान्य करावे लागते. सर्वत्रिक मोफत शिक्षण देण्यासाठी १९४८ हे साल उघडावे लागले. मराठवाड्यामध्ये तर १९६० ला योजना सुरू झाली. यावरून शाहू  महाराजांनी किती वर्षांपूर्वी शिक्षणाची गरज ओळखले होते. यातच त्यांची थोरवी दिसून येते. सर्व शाळेमधून स्पृश्य-अस्पृश्य विद्यार्थ्यांँा समान वागणूक मिळाली पाहिजे. याची त्यांनी काळजी घेतली होती. तसा हुकूम काढला होता त्यांना ममतेने आदराने वागवावे. समतेच्या पायावर उभे करावे असे त्यांचे मत होते. अस्पृश्यांना जर समतेने वागवलं नाहीतर त्याचा जाब शिक्षकांना द्यावा लागेल. त्या संस्थांचे अनुदान थांबवले जाईल असे महाराजांनी बजावले होते.

प्रस्थापित हितसंबंधांच्याविरुद्ध सामाजिक बदल करू पाहणारा गौतमबुद्ध, महात्मा बसवेश्वर यांच्यावर सुद्धा असेच आरोप झाले होते. लोक काय देवालाही शिव्या देतात, नावे ठेवतात. छत्रपती शाहू महाराजांनी राजे असूनसुद्धा दीनदलित पददलित गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी उन्नतीसाठी प्रगतीसाठी हा वसा व विडा उचलला होता हे मान्य करावे लागेल.

आज स्वातंत्र्यानंतर सुद्धा दीनदलितांच्यावर मागासवर्गययावर होणारे अन्याय होणारे अन्याय जुलूम पाहिले की, छत्रपती शाहू महाराजयांच्या काळातील शिक्षा,उपाय आठवणीत येणारच

**संदर्भ**

१)राजर्षी शाहू गौरवग्रंथ. संपादक प्रा. डॉ. रमेश जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई १९७६
२)राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य प्राचार्य रा. तु. भगत सिद्धराज प्रकाशन पुणे २००३.
३)छत्रपती राजर्षी शाहू महाराज तु . बा. नाईक मेहता पब्लिकेशन हाऊस, १९८५
४)श्री.शाहू छत्रपतींचे अर्थकारण प्रा. मीना कुलकर्णी गौरीनंदन पब्लिकेशन कोल्हापुर. १९७६
५)छत्रपती शाहू स्मृतीदर्शन श्री. हिंदुराव साळुंखे महाराष्ट्र ग्रंथ भांडार. १९९८
६)राजर्षी शाहू छत्रपती धनंजय कीर पोपुलर प्रकाशन मुंबई. २०११